# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 15/08/2022 (सोमवार)

---

### . जनावरांची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

.

दिनांक १३/०८/२०२२ रोजी पो. स्टे. रामटेक येथील पोलीस स्टाफ हे पो. स्टे. रामटेक हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना फोनद्वारे माहीती मिळाली की, मौजा मरारवाडी जंगल शिवार ते चोरबावली कडे जाणारा जुण्या रस्त्यावर एक ट्रक बंद अवस्थेत आहे. सदर घटनास्थळी जाउन पाहिले असता एमएच– ४०/वाय– ०१६१ क्रमांकाचा आयशर कंपनीचा कथिया रंगाचा ट्रक उभा दिसला. ट्रक चे केबिन व डाल्याचे आजू बाजूला चालक मालक यापैकी कोणी दिसून आले नाही. त्यात तीन गोवंश गाय व बैल हे दोराने बांधुन मृत अवस्थेत दिसुन आले व ट्रक च्या डाल्यामधे गोवंश जातीचे दोन गायी व एक बैल असे एकूण तीन गोवंश कोंबून त्यांचे मानेला व पायाला आखूड दोरीने अत्यंत निर्दयतेने व क्लेशदायक पध्दतीने बांधून मृत अवस्थेत दिसून आले. सदर गोंवंश हे कत्तल करण्याचे प्रयोजनासाठी अज्ञात ट्रक चालक नेत असतांनी गोंवश गुदमरून मरण पावलेले अवस्थेत दिसुन आले व ट्रक सोडूण पडून गेले. जनावर व वाहनासह असा एकुण कि. १० लाख रू. चा मुद्देमाल घटनास्थळी जप्ती करण्यात आला.

सदर प्रकरणी सरतर्फे सपोनी अमित पांडेण्ये पो स्टे रामटेक यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ११(१),(ए)प्राणी.११(१)(क),५ अ, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम ४२९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा गजानन उकेबोदे मो.नं. ९८८१२४१०८९ हे करीत आहे.

.

### . जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### . पोलीस स्टेशन केळवदची कारवाई

.

अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील पाढुर्णा ते नागपूर हायवे क्र. ४७ वरील बिहाडा फाटा येथे दिनांक १३/०८/२०२२ चे २२.०० वा. सुमारास आरोपी नामे– १) शेख अनिस शेख शबिर वय २७ वर्ष, रा. पानी टाकी जवळ परासिया नाका हाऊसिंग बोर्ड कॉलनि छिंदवाडा जि. छिन्दावाडा (मप्र) ड्रायव्हर, २) मोहम्मद ईसा शेख अक्रम शेख वय २२ वर्ष रा. वार्ड क्र. ३७ हमसफर ब्युटी पालर च्या जवळ दिवांची पुरा जि.छिन्दावाडा (मप्र) कन्डक्टर, ३) शिवगिरी गोपालगिरी गोस्वामी वय २९ वर्ष रा. वार्ड क्र. १९ ग्राम जमुनिया पोस्ट जमुनिया ता. छिन्दवाडा जि. छिन्दावाडा (मप्र) यांनी संगणमत करुन स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी महाराष्ट्र राज्यात गौवंश हत्या बंदी असताना कोणत्याही प्रकारचा जनावर वाहतुकीचा परवाना व जनावर खरेदी पावती न बाळगता यातील आरोपीतांनी आपल्या ताब्यातील आयसर गाड़ी क्र. एमएच– ४०/सि.डी–८७०२ किमती २२,००,०००/–रु. चे वाहनामध्ये १९ नग म्हशी व १ नग हेला गौवंश कि. ५,४०,०००/– रुपये असा एकुण किमती २७,४०,०००/– रु. माल अत्यंत क्रुर व निर्दयतेने, डांबुन आकुड दोरीने बांधुन, त्यांना चारा पाण्याची व्यवस्था न करता अपुऱ्या जागेत दाटीवाटीने कोंबुन अवैधरीत्या कत्तलीसाठी वाहतुक करताना व भरधाव वेगाने व निष्काळजीपने वाहन चालवीतांना मिळुन आले. तसेच वाहणामधील १ म्हैश व १ हेला गौवंश यांच्या मरणास आरोपी कारणीभुत ठरले.

सदर प्रकरणी सर तर्फे पोशि सचिन येळकर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ११ (१)(घ)(ड)(च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधि. १९६० सहकलम ५ (अ) ९ महाराष्ट्र प्राणी सरंक्षण अधिनीयम १९९५ सह कलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनीयम १९५१ सहकलम १९२ (अ), १७९, १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास नापोशी चटप मो नं ८३२९७२७६११ हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे केळवद :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील अँडहॉक चावला भारत पेट्रोलपंप मौजा परसोडी शिवार येथे दिनांक १४/०८/२०२२ चे ०२.१४ वा. सुमारास फिर्यादी नामे– अजय शिवशंकर मोवाडे वय २३ वर्ष रा. वार्ड क्र ०३ जोगा ता. सावनेर जि. नागपूर यांच्या मालकाचा अँडहॉक चावला भारत पेट्रोलपंप परसोडी या पेट्रोलपंप चे ऑफिसच्या ड्राव्हर मध्ये ठेवलेले ३९,९४२/–रूपये अज्ञात आरोपीने पेट्रोलपंपचा बाथरूम जवळून रात्री ०२.१४ वा . ऑफिसचे उघडे दार ढकलून ऑफिस मध्ये प्रवेश करून ड्राव्हर उघडून दुस–या ड्राव्हरची चाबी घेऊन त्या चाबीने कॅशचा ड्राव्हर उघडून त्यातील एकून नगदी ३९,९४२ /–रूपये ची चोरी करून निघून गेला.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केंळवद येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री.अमीत आतराम हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे कळमेश्वर** :– अंतर्गत मौजा पलॉट न १९ ब्राम्हणी वार्ड न ०४ कळमेश्वर येथे दिनांक १३/०८/२०२२ चे २१.०० वा. ते १४/०८/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– प्रभाकर गणपतराव मुंडवाईक वय ५२ वर्ष रा. ब्राम्हणी वार्ड क्र ०४, कळमेश्वर याने किरायाने दिलेल्या घरासमोर गाडी क्र एमएच– ४०/एन– २५८२ हि उभी केली. फिर्यादीने सकाळी उठुन पाहीली असता गाडी ठेवलेल्या ठिकाणी दिसली नाही. अज्ञात आरोपीने फिर्यादीची एमएच– ४०/एन–२५८२ क्रमांकाची गाडी किमत ४०,०००/– रू. ची चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कंळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी टिपले मो न ९९६०७५७१७४ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे रामटेक** :– अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील मौजा नंदापुरी ते मौदा येथे दिनांक १४/८/२२ चे १३.३० ते १४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– सतिश रामकिशोर गुप्ता, वय ५५ वर्ष, रा. नंदापुरी त मौदा हे आपल्या घरी हजर असता त्यांचे मोबाइल नंबर वर आरोपी नामे– मोहन श्रीवास्तक याने फोन करून म्हटले की, 'तुम्हचे क्रेडीर्ट कार्ड एस बी आय चे बिल भरायचे आहे,' असे सांगुन फिर्यादी यांना विश्वासात घेवुन टप्पा टप्पाने २४,९८२/–रू. प्रमाणे एकुण ९९,९२८/–रू., व २५,०००/–रू. बॅकेतुन असा एकुण कि. १,२४,९२८/–रू. काडुन घेतले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादवी, सहकलम ६६ क, ६६ ड माहीती तंत्रज्ञान (सुधारणा) अधि.२००८ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री मकेश्वर मो.नं. ९०४९९६५०१४ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत शेंबडा येथे दिनांक १२/०८/२०२२ चे १०.३० वा. सुमारास **कु. दिव्या नेवराम गि–हारे(मृतक) वय १९ वर्षे रा.शेंबडा** हीचे बीएससी फस्ट ईयर चे पेपर चांगले न गेंल्याचे कारणावरून तिने आपल्या रहाते घरी कोणी नसतांना धान्यात टाकायची विषारी पावडर खाल्याने तिची प्रकृती खराब झाली. तिला प्राथमीक उपचार सरकारी दवाखाना सावनेर येथे नंतर नागपुर मेडीकल कॉलेज येथे भरती केले असता दि. १२/०८/२२ चे रात्री ०९. ३० वा. तिला डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. सदर चा मर्ग टपालदवारे प्राप्त कागदपत्रावरून दाखल करून चौकशीत घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नेवराम भैयालाल गिऱ्हारे, वय ४८ वर्ष, रा. शेंबळा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार भुक्ते मो.क्र. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यू

१) पो.स्टे. पारशिवनी:– अंतर्गत १३ कि. मी. अंतरावरील मौजा वार्ड क्र. २ डोरली येथे दिनांक १४/०८/२२ चे १८.०० वा. सुमारास **नंदकिशोर विजय बोराडे (मृतक), वय ३९ वर्ष, रा. वार्ड क्र २, डोरली १३ ता. पारशिवनी** याने शेतीकरीता बॅकेतुन कर्ज घेतले होते. ते परतफेड करू शकला नाही तसेच सहारा इंडीया लिमीटेड कंपनी बंद झाल्याने त्याचा रोजगार बंद झाल्याने त्याने मानसीक तनावातुन आपल्या घराच्या बेडरूम च्या स्लपचा लोखंडी हुकला पाळण्याची पिवळया रंगाची दोरीने स्वताहा गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विजय गुनवंता बोराडे, वय ६२ वर्ष रा वार्ड क्र २ डोरली १३ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा प्रभाकर झोड मो क्र ८८०६३५३४४६ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कळमेश्वर:– अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील लखमा खेरी शिवार रामकृष्ण बागडे यांचे पोल्ट्री फार्मवर येथे दिनांक १४/०८/२२ चे १८.०० वा. सुमारास फिर्यादीची पत्नी **सौ शारदा गोलू भोपा(मृतक) हमु, लखमा खैरी शिवार रामकृष्ण बागडे यांचे पोल्ट्री फार्मवर** हीने अज्ञात कारणातुन छताला असलेल्या लोखंडी पाईपला ओडणीच्या साहाय्याने गळफास घेतल्यानंतर ती मृत अवस्थेत आढळुन आली.

सदर प्रकरणाी फिर्यादी नामे– शेलु रामलाल भोपा वय ३० वर्ष, रा. वरूड ता. वरूड जि. अमरावती ह मु लखमा खैरी शिवार रामकृष्णा बागडे याचे पोल्ट्री फार्मवर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि पाली ९९६०७५७१७४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**